दिनांक : १९/०५/२०२४

# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

## प्रेस नोट

बृहन्मुंबई शहरात दि. १८/०५/२०२४ रोजी २२.०० वा ते दि. १९/०५/२०२४ रोजी ०१.०० वा. चे दरम्यान All Out Operation राबविण्यात आले. मुंबई शहरातील सर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त वाहतूक/विशेष शाखा/संरक्षण व सुरक्षा, परिमंडळीय पोलीस उप आयुक्त, पोलीस उप आयुक्त विशेष शाखा/संरक्षण/सुरक्षा, विभागीय सहायक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी एकत्रित सर्व मुंबई शहरात All Out Operation ची कार्यवाही केली.

मा. पोलीस आयुक्त, श्री. विवेक फणसळकर व मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. सत्य नारायण यांनी पोलीस ठाणे, नाकाबंदीचे ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन मार्गदर्शन केले व All Out Operation प्रभावीपणे राबविण्यात आले आहे.

**All Out Operation मध्ये पुढील कारवाई करण्यात आली -**

- मुंबई पोलीसांच्या रेकॉर्डवरील ०७ पाहिजे/फरारी आरोपीतांना (Wanted / Absconder ) अटक करण्यात आले आहे.
- एकुण १७ अजामीनपात्र वॉरंट (Non Bailable Warrant) ची बजावणी करून आरोपीतांना अटक करण्यात आली.
- अंमली पदार्थ खरेदी/विक्री करणाऱ्या इसमांवर अंमलीपदार्थ विरोधी कायदा (NDPS ACT) अन्वये एकुण ४६ कारवाया करण्यात आल्या.
- अवैध शस्त्र (Illegal weapons) बाळगणाऱ्या एकुण ३१ कारवाया करण्यात आल्या असून त्यात चाकू, तलवारी इ. शस्त्रे जप्त करण्यात आली.
- अवैध दारू विक्री / जुगार इ. अवैध धंदयांवर १५ ठिकाणी छापे टाकून, अवैध धंदे समूळ उध्वस्त करण्यात आले. त्यादरम्यान २५ आरोपीतांस अटक करण्यात आली.
- महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम १४२, १२०,१२२ व १३५ अन्वये संशयितरित्या वावरणारे इसमांवर एकुण ८२ कारवाया करण्यात आल्या आहेत.

- बृहन्मुंबई शहरात एकुण २०५ ठिकाणी कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले, त्यामध्ये अभिलेखावरील १०९५ आरोपी (रेकॉर्डवरील) तपासण्यात आले. त्यामध्ये २१२ आरोपी मिळून आले. त्यांचेवर गुणवत्तेप्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.
- सर्व पोलीस ठाण्याचे हद्दीत एकुण १६०५ ठिकाणी नाकाबंदी (Nakabandi) लावण्यात आली होती.

  १) त्यामध्ये एकुण ५८३६ दुचाकी/चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली.

  २) मोटार वाहन कायद्यान्वये १५५८ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली.

  ३) कलम १८५ मोवाका अन्वये ०१ वाहन चालकांवर Drunk & Drive ची कारवाई करण्यात आली.
- बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाईचे अनुषंगाने एकुण ७३८ हॉटेल, लॉजेस, मुसाफिरखाने यांची तपासणी करण्यात आली.
- प्रतिबंधात्मक कारवाईचे अनुषंगाने मर्मस्थळे व संवेदनशिल ठिकाणे एकुण ५३९ तपासणी करण्यात आले.

* * *